**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातमीपत्र**

**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः 25.01.2024** **वारः शुक्रवार**

---

**ठळक बातम्या**

विधानसभा निवडणुकीसाठी अनेक विद्यमान मंत्री, आमदारांसह मातब्बर उमेदवारांचे अर्ज दाखल

काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची उमेदवारांची पहिली यादी जाहीर

अंतराळ क्षेत्रासाठी एक हजार कोटी रुपयांचा भांडवली निधी स्थापन करण्याला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

भोसरीमध्ये पाण्याची टाकी कोसळून झालेल्या दुर्घटनेत पाच मजुरांचा मृत्यू

आणि

पुणे क्रिकेट कसोटीमध्ये भारताच्या फिरकीपटूंकडून पहिल्याच दिवशी न्यूझीलंडचा संघ 259 धावात गारद; वॉशिंग्टन सुंदरचे सात बळी

**उमेदवारी अर्ज**

राज्यात विधानसभा निवडणुकीची धामधूम जोरात सुरू झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं 45 उमेदवारांची तर काँग्रेसनं 48 उमेदवारांची पहिली यादी काल जाहीर केली.राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने आपल्या पहिल्या यादीत कर्जत जामखेड मतदारसंघासाठी रोहित पवार, बारामतीसाठी युगेंद्र पवार, पारनेरमध्ये राणी लंके आणि तासगाव-कवठे महांकाळ मतदारसंघात रोहित पाटील यांना उमेदवारी दिली आहे. काँग्रेसकडून माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना कऱ्हाड

दक्षिणमधून,  नाना पटोले यांना साकोलीमधून, तर विजय वडेट्टीवार यांना ब्रह्मपुरीमधून उमेदवारी देण्यात आली आहे. पुण्यातल्या कसबा विधानसभा मतदार संघातून रवींद्र धंगेकर यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. महायुती आणि महाविकास आघाडीतील घटक पक्षांच्या बहुतांश उमेदवारांनी काल गुरुपुष्यामृताचा योग साधत आपापले उमेदवारी अर्ज दाखल केले. यात अनेक मंत्री, आमदार आणि दिग्गज नेत्यांचा समावेश होता. बहुतांश उमेदवारांनी शक्तिप्रदर्शन करत, जाहीर सभा घेत तर कुणी कसलाही गाजावाजा न करता साधेपणानं उमेदवारी अर्ज दाखल केले. मनसे, शेकाप आणि वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांनीही काल अर्ज दाखल केले. भाजपाकडून चंद्रकांत पाटील यांनी पुण्याच्या कोथरूड मतदारसंघातून, राधाकृष्ण विखे पाटील यांनी शिर्डीतून,  तर मंगलप्रभात लोढा यांनी मुंबईच्या मलबार हिल मतदारसंघातून काल आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. डॉ. विजयकुमार गावीत यांनी फारसा लवाजमा घेऊन न जाता नंदुरबार विधानसभा मंतदारंसंघातून अर्ज दाखल केला. छगन भुजबळ, धनंजय मुंडे, दिलीप वळसे पाटील, या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तर संजय राठोड या शिवसेनेच्या मंत्र्यांचाही काल अर्ज भरणाऱ्यांमध्ये समावेश आहे.शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे युवा नेते आणि माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करत मुंबईच्या वरळी मतदारसंघातून अर्ज दाखल केला.

इंदापूर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार हर्षवर्धन पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. मनसेचे ठाणे मतदारसंघातले उमेदवार अविनाश जाधव यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला. सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर इथं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून जयंत पाटील, तर सांगली विधानसभा मतदारसंघात भाजपाच्या सुधीर गाडगीळ यांनी अर्ज दाखल केला. तासगाव-कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघात रोहित पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून अर्ज दाखल केला. सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळ विधानसभा मतदारसंघातून आमदार वैभव नाईक यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करण्यापूर्वी त्यांची कुडाळ शहरामध्ये जाहीर सभा झाली. रत्नागिरी जिल्ह्यातल्या विविध मतदारसंघांमध्येही काल प्रमुख पक्षांच्या उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे डॉक्टर किरण लहामटे, नगर शहर मधून राष्ट्रवादीचे आमदार संग्राम जगताप यांनी तर शिर्डी विधानसभा मतदारसंघातून डॉक्टर राजेंद्र पिपाडा यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला. राहुरी मतदारसंघातून भाजपचे माजी आमदार शिवाजी कर्डिले यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.काँग्रेसच्या

यशोमती ठाकूर यांनी अमरावती जिल्ह्यातल्या तिवसा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला.विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याच्या कालच्या तिसऱ्या दिवशी राज्यात 552 उमेदवारांनी 720 उमेदवारी अर्ज दाखल केल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. दरम्यान नांदेड लोकसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीसाठी काल काँग्रेसचे रविंद्र चव्हाण यांच्यासह अन्य एका इच्छुकाचा अर्ज दाखल झाला. या लोकसभा मतदारसंघात आतापर्यंत तीन उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

**मतदान जागृती**

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची राजकीय पक्षांची लगबग सुरू असतानाच निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी प्रशासन अनेक उपक्रम राबवत आहे. मुंबई विद्यापीठानं विविध महाविद्यालयांच्या सहकार्यानं निवडणूक साक्षरता उपक्रमांची मालिका सुरु केली आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांना मतदार जागृतीबाबत प्रशिक्षण, निवडणूक साक्षरता क्लबची स्थापना, मतदानाची शपथ आणि ईव्हीएम व्हीव्हीपॅटचं प्रात्यक्षिक यासारख्या उपक्रमांचा समावेश आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात हे कार्यक्रम घेण्यात येत आहेत.पिंपरी चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघात मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी आरखडा तयार करण्यात आला आहे. शहरी मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी जनजागृतीपर कार्यक्रम राबवण्यात येत आहेत. महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये “नो युवर वोटींग सेंटर” ही हेल्पलाईन सुरू करणार असल्याचं पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजय कुमार खोराटे यांनी सांगितलं. अजंठानगरच्या “होम फॉर द ब्लाईंड” या अपंग रोजगार उद्योग आणि तांत्रिक प्रशिक्षण केंद्रात मतदार जागृतीचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात दृष्टिहीन मतदारांनी मतदानाची शपथ घेतली. तसंच सर्व पात्र मतदारांनी मतदान करावं असं आवाहनही केलं.ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ आणि निवेदिता सराफ यांनीही सर्व मतदारांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे ..

**कॅबिनेट निर्णय**

अंतराळ क्षेत्रासाठी एक हजार कोटी रुपयांचा व्हेंचर कॅपिटल निधी स्थापन करण्याला काल केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. या प्रस्तावित व्हेंचर कॅपिटल निधीचं कार्य प्रत्यक्ष सुरू झाल्याच्या तारखेपासून पाच वर्षांसाठी तो लागू करण्याची सरकारची योजना आहे. या अंतर्गत गुंतवणुकीच्या संधी आणि निधीची गरज लक्षात घेऊन दर वर्षाला सरासरी दीडशे ते 250 कोटी रुपयांची रक्कम देण्यात येईल. राष्ट्रीय प्राधान्यं आणि नवोन्मेष तसंच आर्थिक वाढीला वाव देऊन त्याबरोबरीनं देशाच्या अंतराळ क्षेत्राची प्रगती व्हावी अशा पद्धतीनं या निधीची धोरणात्मक आखणी करण्यात आली आहे.

**प्रदर्शन**

दुग्धव्यवसाय, मत्स्यपालन आणि पशुखाद्य व्यावसायिक तसंच शेतकऱ्यांसाठी आठव्या आंतरराष्ट्रीय डेअरी आणि पशुखाद्य प्रदर्शनाचं उद्घाटन काल पिंपरीमध्ये झालं. दूध, दुग्धजन्य उत्पादनं आणि यंत्रसामुग्री पुरवणाऱ्या जवळपास 100 कंपन्यांनी या प्रदर्शनात सहभाग घेतला आहे. येत्या शनिवारपर्यंत सकाळी 10 ते संध्याकाळी 6 या वेळेत हे प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य खुलं राहणार आहे.

**दिव्यांग**

कोल्हापूरमध्ये दिव्यांगांच्या विशेष शाळेतील विद्यार्थ्यांनी दिवाळी निमित्त तयार केलेल्या विविध वस्तूंचं प्रदर्शन भरवण्यात आलं आहे. याचं उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. यांच्या हस्ते झालं.

**अपघात**

पिंपरी-चिंचवडच्या भोसरी इथल्या सद्गुरु नगर परिसरात काल सकाळी पाण्याची टाकी कोसळून झालेल्या दुर्घटनेमध्ये पाच मजुरांचा मृत्यू झाला; आणि काहीजण जखमी झाले आहेत. एका खासगी प्रकल्पाच्या परिसरात ही दुर्घटना घडली. अग्निशमन दलाच्या मदतीने बचावकार्य करण्यात आलं.

## क्रिकेट

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातला दुसरा कसोटी क्रिकेट सामना कालपासून पुण्यात सुरू झाला. पहिल्याच दिवशी भारताच्या दोन फिरकीपटूनी न्यूझीलंडचा डाव 259 धावांत गुंडाळला. न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला; रविचंद्रन अश्विन आणि वॉशिंग्टन सुंदर यांच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर न्यूझीलंडचा पूर्ण संघ 259 धावा करून तंबूत परतला. वॉशिंग्टन सुंदरनं सात तर रविचंद्रन अश्विननं तीन गडी बाद केले. कालच्या दिवसाच्या खेळ संपला तेव्हा भारताच्या 1 गडी बाद 16 धावा झाल्या होत्या. शुभमन गिल 10 तर यशस्वी जैस्वाल 6 धावांवर खेळत आहेत.

## महिला क्रिकेट

भारत आणि न्यूझीलंडच्या महिला क्रिकेट संघांमध्ये झालेला मर्यादित षटकांचा सामना काल भारतानं 59 धावांनी जिंकला. आणि तीन सामन्यांच्या या मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली. अहमदाबादमध्ये झालेल्या कालच्या  सामन्यात भारतानं पाहुण्या संघाला 228 धावांचं लक्ष्य दिलं होतं. मात्र न्यूझीलंडचा संपूर्ण संघ 41 व्या षटकापर्यंत केवळ 168 धावाच करू शकला.

## हवामान

राज्यात सर्वत्र आज हवामान कोरडं राहील; मात्र उद्यापासून पुढचे चार पाच दिवस विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरंच प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**